**नि. फौ. ख. क्र.२४६/२०२०**

सरकार वि. सिताराम खारतोडे ,

**नि.क्र.९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव– पोपट अंकुश कोळी ,**

वय– ३५ वर्षे, नेमणूक – वनरक्षक,

रा. सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

दि.२३/०३/२०१७ रोजी मी वनरक्षक या पदावर बिरगुडवाडी, ता.इंदापूर येथे कार्यरत होतो. त्यावेळी सिताराम खारतोडे यांनी फॉरेस्ट गट नं.१५७५ मधून ४६५ मिटर लांबीचे २ मीटर रूंद चारी खांदून त्याचेमध्ये ५ इंच व्यासाची पाईपलाईन टाकली होती. त्याबद्दल मी वन गुन्हा नोंदविला. घटनेची हकीकत वरिष्ठांना कळविली. आता मला मी दिलेली पी.ओ.आर. दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०** देण्यात येते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.डी.डी.सांगळे, विधीज्ञ यांचेमार्फत –**

२. इंदापूर तालुक्यात ब–याच गावांना लागून वनक्षेत्र आहे. ब–याच लोकांच्या पाईपलाईन वन जमिनीतून गेल्या का कसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथीत पाईपलाईनची प्रत्यक्ष पाहणी केली नाही. पाईपलाईन आरोपीचीच आहे त्याची स्थानिक चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची पाईपलाईन आहे याचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. पाईपलाईन आरोपीचीच आहे याचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, संशयावरून

आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वन खात्याचा कोटा पुर्ण करण्यासाठी खोटी केस केलेली आहे. प्रस्तुत प्रकरण हे नस्तीबध्द केलेले आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०१/११/२०२५**